**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 9 No.5** **May-June 2022**

# भिल्लांच्या पोटजातीचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवीन नांदेड
**DOI- 10.5281/zenodo.14870450**

**गोषवारा :-**

भिल्ल भारतात लोकसंख्येने मोठी असलेली एक आदिवासी जमात असून विंध्य व सातपुडा पर्वतावरील दाट वन्यपठारे हे त्यांचे मूळ वस्तीस्थान आहे वैदिक वाङ्मयात भिल्लांचा उल्लेख 'निषाद' म्हणून करण्यात आल्याचे विद्वांनाचे मत आहे. "भिल्ल हा शब्द विल्सन यांच्या मतानुसार द्रविडी भाषा समूहातील विल्ल किंवा बिल्ल (धनुष्यबाण) या शब्दापासून आलेला आहे. त्यांची भाषा भिल्ली असून तिच्या अनेक बोलीभाषा आहेत. त्यात अहिराणी पावरी इत्यादी बोलीभाषा असून प्रादेशिक भाषांतील शब्दांची सरमिसळ झालेली आहे. भिल्ल गरासिया, ढोली, भिल्ल, डुंगरी भिल्ल, मेवासी भिल्ल, तडवी भिल्ल, शवल भिल्ल, भिलाला, भिल्ल मीना इत्यादी भिल्ल जमातींच्या पोटजाती आहेत. भिल्ल प्रोट्रो-ऑस्ट्रॉलॉइट वंशातील असून काळसर वर्ण, लांबट ठोके, चपटे नाक, गोल उभट चेहरा व मध्यम उंची ही त्यांची शारीरिक वैशिष्टये होत.

**बिज संज्ञा :- भिल्ल, भिल्लांच्या पोटजाती, आदिवासी.**

**प्रस्तावना :-**

भारतीय समाजात विविध आदिवासी आणि पोटजातींचे अस्तित्व आहे, आणि यापैकी एक महत्त्वपूर्ण आदिवासी समूह म्हणजे भिल्ल. भिल्ल हे मुख्यतः मध्य भारत, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र आणि अन्य काही राज्यांमध्ये राहणारे आदिवासी आहेत. भिल्लांच्या पोटजातींचा अभ्यास हा त्यांच्या सामाजिक संरचना, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, आर्थिक स्थिती आणि भौगोलिक विस्तार यावर आधारित आहे.भिल्ल समुदायाचा इतिहास, त्यांची जीवनशैली, परंपरा आणि पोटजातींच्या विविधतेचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे कारण या समुदायाने आपल्या आदिवासी जीवनपद्धतीत अनेक बदल अनुभवले आहेत. भिल्ल समाजाची विविध पोटजाति त्यांच्याआधारे असलेल्या भौगोलिक, सांस्कृतिक, आणि सामाजिक विशेषतांचा परिष्कार करते. काही पोटजातिंमध्ये त्यांच्या भाषिक विविधता, जातीसंस्था, विवाह पद्धती, धार्मिक विश्वास आणि पारंपरिक रोजगार यामध्ये भिन्नता आढळते.

भिल्लांच्या पोटजातींचा चिकित्सक अभ्यास केल्याने, समाजातील विविध गटांच्या अस्तित्वाची आणि त्यांचा इतर समाजाशी असलेला संबंध याचे स्पष्ट चित्र मिळवता येते. या अभ्यासामुळे भिल्ल समाजाच्या पोटजातींच्या आंतरसंबंध, सामाजिक न्याय आणि समावेशी धोरणांची जाणीव निर्माण होईल, जेणेकरून त्यांच्या हक्कांची अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण होऊ शकेल.

**उद्देश :-**

1. भिल्लांच्या पोटजातीचा अभ्यास करणे.
2. भिल्लांच्या पोटजातीच्या समाज जीवनाचे अध्ययन करणे

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तावित शोधनिबंधात प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांकडून आवश्यक सामग्रीचे संकलन केले आहे. सहायक ग्रंथ आणि संशोधन निबंध इत्यादींचा विश्लेषणात्मक अभ्यास केला गेला आहे.

**भिलांच्या जाती :-**

भिल्ल लोकांना भिल्ल हे नाव द्रविडीयन भाषेवरुन पडले. धनुष्याला द्रविडीयन भाषेत भिल्ल असे म्हणतात. बील्ल (धनुष्य) धारण करणारे ते भिल्ल अशी त्यांच्या नावाची उत्पत्ती सांगण्यात येते. काही तमीळ कवींनी उत्तर भारतातील रानटी आदिवासींना उद्देशून "बिल्लवर" (धनुर्धर) असा शब्दप्रयोग केलेला आहे. सध्या भिल्ल जमात जी दिसते त्यांच्या पूर्वजांना उद्देशून तमिळ कवींनी हा शब्द वापरला असावा असे केंब्रीज इतिहासकाराचे मत आहे. भिल्ल किंवा बिल्ल या शब्दाच्या द्रविडी भाषेत, धनुष्य असा अर्थ होतो. याचा संदर्भ भिल्ल ह्या इंग्रजी पुस्तकात आढळतो. त्यामध्ये एस. एल. जोशीनी खालील प्रमाणे म्हटले आहे. "The term, Bhil is derived from the Dravidians Equivalent of the world Bows characteristic weapon of the tribes" भिल्लांच्या हातात पुर्वी धनुष्य दिसत असे. शिकार करणे हा त्यांचा व्यवसाय होता. महाभारतात गुरु द्रोणाचार्यासाठी

अंगठा देणारा शिष्य (एकलव्य भिल्ल) याचा उल्लेख सापडतो.6 काही अभ्यासकांच्या मते, "भिल्लांमध्ये मावची, पावरा, तडवी, वळवी, गावीत, काटेला, धानका, वसावा, परमार इत्यादी बारा पोटजाती आहेत" बराड, डागची, भिल्ल रजपूत, भिल्ल कुणबीही आहेत, आदिवासी भिल्लांच्या अनेक जाती-उपजाती व पोटजाती असून काही प्रमुख पोट-जमाती पुढीलप्रमाणे आहेत.

**1)बरडे भिल्ल :**

अजिंठा डोंगर परिसरालगत उत्तरपूर्व काही भागांत बरडे भिल्लांची वस्ती आहे. मुख्य गावांपासून त्यांची वस्ती वेगळी असते. अशा वस्त्यांना 'भिलोटया' असे म्हणतात. त्या जमातीच्या आदिवासींची परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. शिक्षणाचे प्रमाणही अत्यल्प आहे. गवत व मोळी विकून किंवा हातमजुरी करुन हे लोक पोट भरतात. मोठया शेतक-यांच्या शेतावर जागले (वॉचमन) म्हणून काम करतात. तसेच ऊस मोडणीच्या हंगामात इतरत्र कामासाठी स्थलांतर करुन जीवन जगत असतात. पुरुषांचा पोषाख सदरा व धोतर किंवा लांब विजार असते. तर स्त्रिया आखूड साडी व चोळीचा वापर करतात. स्त्रिया डोक्यावरुन पदर घेतात.

**2)मावची :**

अजिंठा-डोंगर परिसरालगत असणा-या सातमाळा प्रदेशातील ही आदिवासी भिल्ल जमातीपैकी ही जमात असून जातीच्या दाखल्यावर 'भिल्ल' किंवा 'मावची' असा उल्लेख करीत असतो. हा समाज शेतीप्रधान असून अतिशय व्यवहारी आहे. त्यांची परिस्थिती साधारण बरी आहे म्हणतात.'मावची आदिवासींची विविध कुळे असून कुळाला मावची भाषेत 'वठसिलो' असे म्हणतात. त्यांच्या स्त्रियांचा पोशाख आणि बोलीभाषा वेगळी असून प्रादेशिकतेप्रमाणे त्यात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. "धर्मांतराच्या प्रभावामुळे मावची आदिवासींचे ख्रिस्तीकरण होऊन येशुविषयक गीते आता मावची लोकसाहित्याचा एक भाग बनू लागली आहेत." त्यांची शैक्षणिक प्रगती बरी असून अनेकांनी सरकारी नोकरीत पदे प्राप्त केली आहेत. त्यांची घरे पक्की असून प्रशस्त आढळून येतात. "राजकीय क्षेत्रातही हे लोक सहभाग घेऊन राजकीय स्पर्धेत चढाओढी करु लागले आहेत."

**3)"गावीत, गामीत, वसावे, वसावा, वळवी, पाडवी" :**

या आडनावांची भिल्ल जमात ही वेगळी पोटजमात नसून ही महत्वाची कुळे आहेत. या आडनावाचे भिल्ल आदिवासी स्वत:ला उच्च दर्जाचे समजतात. स्वातंत्रपूर्व काळात यांच्या काही जहांगीरदारी किंवा भिल्ल इस्टेटीचे लहान-मोठे राजे होते. भिल्ल प्रदेशात पहाडात राहणारे पाडवी, वरच्या भागात राहणारे पळवी, वसाहती करुन किंवा गावे करुन राहिलेले वसावा वसावे आणि मूळ समाजापासून तुटलेले दूर झालेले, तडवी अशी त्यांची स्थानपरत्वे कुळनावे झाली असावीत. अजिंठा डोंगर परिसरालगत या समाजाची बरीच वस्ती आहे. या समाजातील जवळ-जवळ 900/- लोकांकडे शेती असून शेती चांगल्या व सुधारित पध्दतीने केली जाते. त्यांचे राहणीमान आणि बोलीभाषेत बरेच साम्य आहे. त्यांच्या स्त्री-पुरषांचा पोषाख वैशिष्टयपूर्ण आहे. आधुनिक स्त्रियांनी यात बराच बदल केला असून प्रगत भागातील स्त्रियांसारखी सहावारी साडी वापरायला सुरुवात केली आहे. "पूर्वी हा समाज लंगोटी लावायचे आता त्यांच्या पोषाखात सुधारणा झाली आहे. कोपरापर्यंत सदरा व कोपरी आणि कमरेला धोतर, अर्धी चड्डी असा पोषाख ते करतात." शैक्षणिकदृष्टया हा समाज बराच सुधारला आहे. त्यामुळे या समाजातून अनेक उच्च पदस्थ अधिकारी बनलेले आहेत.

**4)नाईक :**

"भिल्ल कुळातील ही एक कारभारी मंडळी समजली जाते. काही गावांचे अधिपत्य पूर्वी त्यांच्याकडे असायचे. त्यावरुन त्यांना नाईक म्हणण्याची प्रथा पडली असावी. नाईक भिल्लांकडे भरपूर शेती असून ते अतिशय चांगले व प्रगत शेतकरी आहेत. त्यांचे राहणीमान सुधारलेले आहे. नाईक मंडळीत अनेक बायका करण्याच्या पध्दती दिसून येतात." त्यांची बोलीभाषा व पेहराव त्या भागात राहणा-या इतर आदिवासींप्रमाणे आहे.

**5)मथवाड भिल्ल :**

अक्कलकुवा आणि अक्राणी तालुक्यांतील सातपुडयांच्या डोंगरद-यांत आणि अतिदुर्गम भागात नर्मदा नदीपर्यंतच्या प्रदेशात राहत असलेल्या भिल्लांना तापी खो-यातील सपाट प्रदेशात राहत असलेले भिल्ल आदिवासी मथवाडे म्हणून ओळखतात. 'अतिदुर्गम प्रदेश असल्यामुळे अजून ही अनेक गावांना रस्त्यांची सुविधा नाही. तसेच शिक्षणाचे प्रमाणही कमी आहे. खडकी, बामणी परिसरातील 50 गावांत साक्षरतेचे प्रमान अतिशय कमी आहे." येथील लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर भागात नसल्यामुळे मजुरीसाठी त्यांना सतत स्थलांतर करावे लागते. या लोकांमध्ये दारिद्र्याचे प्रमाणही खूप असून आरोग्याविषयी समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागते.

**6)लांढया भिल्ल :**

तळोदा आणि अक्कलकुवा तालुक्यांतील आदिवासींचा हा एक प्रादेशिक समूह असून सातपड्यातील भिल्ल यांना 'लाढया' किंवा 'लाडक्या' या नावाने ओळखतात. हे आदिवासी प्रामुख्याने वळवी, वसावे, वसावा, पाडवी या कुळाचेच आहेत.

**7)धानका :**

यांची वस्ती अक्कलकुवा व नंदुरबार तालुक्यांतील सातपुडा पर्वत रांगात यांची वस्ती आहे. याप्रदेशाला लागून असणा-या गुजरात राज्यातही त्यांची वस्ती आहे. हे

प्रामुख्याने हिंदू धर्मीय होते. सध्या हिंदू धर्मीय व काही मुस्लिम धर्मीय आहेत. यांच्या नावास ऐतिहासिक पार्श्वभ्ूमी आहे. “अहमदाबादच्या सुलतान महंमद बेगडा याने पावागडच्या राजाचा पराभव केला तेव्हा त्यांचे सैनिक आणि प्रजानन जंगलात पळून गेले. तेथे त्यांनी काही दिवस धान म्हणजे कच्चे धान्य खाऊन जीवन व्यक्तीत केले म्हणून त्यांना ‘धानका’ असे नाव पडले.” तसेच काही लोकांनी नर्मदा तटावर जाऊन वस्ती केली म्हणून त्यांना ‘तटवी’ व त्यांचे रुपांतर ‘तडवी’ असे म्हटले जाते. धानकांचीच तेतरिया नावाची एकपोट जात आहे.

**8) बोंडे गबाल :**

हा लोकसंख्येने अतिशय कमी असलेला आदिवासी गट असून हा भटकी जमात काही लोकांनी विशिष्ट गावात वास्तव्य केले आहे. ‘बोंडे गवाल’ हे आदिवासी देवदेवतांचे मुखवटे बांधून कथा सांगत गावोगावी फिरतात आणि भिक्षा मागून धान्य गोळा करतात. गुरे चारण्याचे तसेच मयताच्या अंत्यविधीच्या वेळी वाद्ये वाजवितात. लग्नकार्यात हे वाजंत्री वाजविण्याचे कामही हे आदिवासी गट करीत असतो.

**9) कोटले भिल्ल :**

या आदिवासींना ‘नयडे’, ‘नरोटा’ व ‘बिवडा’ या तुच्छ नावानेही प्रगत समाज ओळखतो. नंदूरबार, तळोदा तालुक्याच्या पूर्वभागात तसेच शहादा तालुक्यात कोरळा भिल्ल समाजाचे वास्तव्य आहे. ही एक अतिशय मागासलेली जमात असून “अस्पृश्यांना ज्याप्रमाणे पुढारलेला समाज तुच्छतेने वागणूक देई. तशीच वागणूक कोटला भिल्लांना दिली जात असे.” शेतमजुरी करुन तसेच मोठया शेतक-याकडे जागल्याचे काम करुन हा आदिवासी जीवन चरित्रार्थ भागवत असतो. त्याशिवाय हातभट्टीची दारु पाडणे, सट्टा बेटिंग खेळणे हा त्यांचा नित्याचा व्यवसाय आहे.

**10) ढाणका :**

ही आदिवासी जमात नवापूर तालुक्याच्या पश्चिम भागात गुजरात राज्याच्या सरहद्दीवर आढळून येतात. ही दुबळी आदिवासी गटातील जमात असून त्यांना नायकडा नायक या नावानेही ओळखले जाते. “हे लोक भूमिहीन असून शेतीत किंवा जंगलात मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करतात. या जमातीत शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. त्यांची भाषा गुजराती मिश्रित असून त्या भाषेला ‘नायकी’ या नावाने ओळखले जाते.” ढाणका भिल्ल स्वत:ला तडवी,तेटारिया, धनका किंवा ढाणका या नावांनी ओळखतात. तडवी भिल्ल व ढाणका भिल्ल यांच्यात मात्र फरक आहे. तडवी भिल्ल प्रामुख्याने मुस्लिम धर्मीय आहेत. “ढाणका भिल्लांमधील कुटुंबसंस्था पुरुषप्रधान असल्यामुळे वारसाहक्क मुलीकडे न जाता मुलाकडे जातो. ढाणका लोकांमध्ये बहिर्विवाह संबंधातून निर्माण झालेले वेगवेगळे गट असून या सर्व गटांचा सामाजिक दर्जा सारखाच आहे. या उपगटांमध्ये आपसांत बेटी व्यवहार होत नाहीत. तडवी कुळीचे लोक इतर दोन कुळींपेक्षा स्वत:ला वरिष्ठ समजतात व इतर उपगटांशी वैवाहिक संबंध जोडत नाहीत.” तर ढाणका हे बहुतेक हिंदु आहेत.

**11) पावरा :**

औरंगाबाद जिल्ह्यातील पावरा लोकांचे वास्तव्य आहे. हे भिल्ल आदिवासीपेक्षा स्वत:ला वेगळे समजतात. नर्मदा खो-याच्या पहाडपट्टीत ते आजही प्राथमिक स्वरुपात जीवन जगत आहेत. “पावरा लोक पावागडहून आले असावेत असा उल्लेख आहे.” राठवा, बोरला, पटेलिया पावरा जातीचे कुळ आहेत. पावरा जातीचे लोक आपण राजपूतवंशीय असल्याचे अभिमानाने सांगतात. तसेच इतर आदिवासी जमातीशी ते रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. पावरा हे उंच, धडधाकट, गोरे आणि नाकी डोळे सरस आहेत. ते व्यवहारी आणि मेहनती असून शेती, शेतमजुरी आणि जंगल यावर उदरनिर्वाह करतात.

**12) ख्रिश्चन भिल्ल :**

ही आदिवासी जमात विशिष्ट एका जातीची नसून ते ख्रिश्चन धर्मांतरीत आदिवासी आहेत. ते जातीच्या दाखल्यावर ही ख्रिश्चन भिल्ल म्हणूनच उल्लेख करतात. “ब्रिटिश राजवटीत ख्रिस्ती मिशन-यांनी धर्मप्रचार सुरु केला. त्यामुळे कधी प्रभाव तर कधी प्रलोभनामुळे आदिवासीं आहेत. ख्रिश्चन मिशन-यांच्या संपर्कामुळे यांची शैक्षणिक व आर्थिक प्रगती चांगली झाली आहे. “ख्रिश्चन आदिवासी रविवारची प्रार्थनेला नियमित जाणे, रात्रीची भजने, गायन इत्यादींच्या साहाय्याने धर्म आणि जनसमुदाय यांच्यातील संबंधांना सतत नित्य नवीन आणि टवटवीत ठेवले जाते. धर्मांतरित आदिवासींच्या घरांत पारंपरिक हिंदू वा आदिवासी देव-देवतांची चित्रे वा मूर्ती ठेवू दिल्या जात नाहीत.” यांचा पेहराव आदिवासी प्रथेप्रमाणेच असून नवीन शिक्षित तरुण पिढी प्रगत समाजाचा पोषाख स्वीकारात आहे. तसेच त्यांची नावे ठेवण्याच्या पध्दतीतही आधुनिकता आली असून पाश्चात्य पध्दतीनेच मुला-मुलींची नावे ठेवलेली आढळतात. त्यांची विवाह पध्दती ख्रिश्चन धर्मपध्दती प्रमाणेच आहे.

**13) तडवी भिल्ल :**

औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव व सिल्लोड तालुक्यात तडवी भिल्ल जमातीचे वास्तव्य आहे. त्यांची संख्या जळगाव जिल्हयातील सातपुडा पर्वतीय भागात अधिक जाणवते. तडवी लोक मुस्लिम धर्मीय असून हिंदू संस्कृतीचेही काही प्रमाणात ते जतन करतात. “ते उंच बांध्याचे, तगडे व देखणे असतात. त्यांचा पोषाख खानदेशी शेतक-यांप्रमाणे असतो. तर स्त्रिया नऊवारी साडी काष्टा पध्दतीने नेसतात. तडवी भिल्लात लग्नाचा मुहूर्त ब्राह्मणांकडून काढला जातो आणि निकाह काझी लावतो.” “तडवी लोक चेहरेपट्टीवरुन सौराष्ट्री वंशात मोडत

असल्याचा अनेक मानववंशीय शास्त्रज्ञांचा तर्क आहे.” तडवी आदिवासींच्या दोन समकक्ष जमाती आहेत. ‘नहाल’ आणि ‘निरठे’ असे प्रकार असून त्यातील ‘नहाल’जमातीचे लोक हिंदू धर्म पाळतात. जंगलांतील कंदमुळे नि फळे आदिंवर उदरनिर्वाह करतात. याचे नेतृत्व नाईक म्हणून संबोधली जाणारी व्यक्ती करीत असते. तडवी भिल्ल मुस्लिम धर्मातील बहुतांशी जीवन पध्दतीते अनुकरण करत असले तरी आज ही मुस्लिम धर्मातील बुरखा पध्दतीचे अनुकरण त्यांनी केलेले नाही. त्यावरुन त्यांना कमी लेखले जात असले तरी ते स्त्रीयांना बुरखा घालावे असे सांगताना आढळून येत नाहीत.

**निष्कर्ष :**

भिल्ल भारतात लोकसंख्येने मोठी असलेली एक आदिवासी जमात असून विंध्य व सातपुडा पर्वतावरील दाट वन्यपठारे हे त्यांचे मूळ वस्तीस्थान आहे. भिल्ल लोकांना भिल्ल हे नाव द्रविडीयन भाषेवरुन पडले. धनुष्याला द्रविडीयन भाषेत भिल्ल असे म्हणतात. बील्ल (धनुष्य) धारण करणारे ते भिल्ल अशी त्यांच्या नावाची उत्पत्ती सांगण्यात येते. काही अभ्यासकांच्या मते, “भिल्लांमध्ये मावची, पावरा, तडवी, वळवी, गावीत, काटेला, धानका, वसावा, परमार इत्यादी बारा पोटजाती आहेत तसेच भिल्ल हे हिदू, मुस्लिम व ख्रिश्चन या तिन्ही धर्माचे पालन करतात परतू त्याचा मूळ धर्म हिदू हा आहे.

**संदर्भ सूची :**

1. नाडगोंडे, गुरुनाथ – ‘भारतीय आदिवासी’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, 2003.
2. गारे, गोविंद-‘आदिवासींच्या समस्या-विचार आणि विश्लेषण’, आदिवासी समाजविज्ञान संस्था, नाशिक, पहिली आवृत्ती, पृ.8.
3. मोरे, माधव बंडू - ‘आदिवासी बोलू लागला’, सुगावा प्रकाशन, पुणे, 1 जानेवारी, 2006.
4. आत्राम, व्यंकटेश- ‘आदिवासी समाज आणि आंबेडकरी चळवळ समज आणि गैरसमज’, सुधीर प्रकाशन, वर्धा, तिसरी आवृत्ती, 2006.
5. पिंगळे भीमराव –‘डोंगरपाडयातील वनवासी (आदिवासी) खंड 1’, अभिनव जीवन प्रकाशन, बीड, प्रथमावृत्ती.
6. कुलकर्णी, वि.श्री. ‘भारतातील आदिवासी वंश’, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंबई, प्रथमावृत्ती 2002.